दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७/२०२१ (श्री. देवेंद्र तोटकेकर वगैरे – अर्जदार वि. श्री.दशरथ चव्हाण वगैरे – सामनेवाला ) मधील नि. १७ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. सामनेवाला क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांनी नि . १ वर म्हणणे न दिल्याने त्यांचेविरुध्द '' अर्ज विनाम्हणणे ' चालविणेबाबतचा आदेश झालेला आहे तो आदेश रद्द होवून त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केला आहे. सामनेवाला क्र. १ व २ यांचे म्हणणे की, त्यांना आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने व वकीलांना अर्जा संदर्भात माहिती देऊ न शकल्याने त्यांना म्हणणे देण्यास विलंब झालेला आहे. म्हणणे मुदतीत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता . सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास अर्जाचा गुणदोषावर निर्णय होण्यास अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १ व २ यांनी त्यांचेविरुध्द 'अर्ज विनाम्हणणे' चालविणेबाबत झालेला आदेश रद्द होवून त्यांचे म्हणणे दाखल करुन घेण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांचे म्हणणे की, सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. सामनेवाला हा एवढया विलंबाने अर्ज का सादर करीत आहे याचे कोणतेही विशेष कारण अर्जात नमुद केलेले नाही . अर्जाचे कामकाजास विलंब व्हावा म्हणून सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांनी रे . दि. मु. नं. ७/२०२० चे दाव्याकामी मे. कोर्टाने दिलेल्या ताकीद आदेशाचा अवमान केलेला असल्याने त्यांना दिवाणी तुरुंगात टाकण्यासाठी व सामनेवाला यांची स्थावर व जंगम

मालमत्ता जप्त करण्यात यावी यासाठी दाखल केलेला आहे . सामनेवाला यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही . परंतु अर्जाचे स्वरुप पहाता सामनेवाला क. १ व २ यांना आपले म्हणणे दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल व अर्जाचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी न्यायालयाला मदतच होणार आहे. सामनेवाला क्र. १ व २ यांचे म्हणणे दाखल करुन घेतल्यास अर्जदार यांचे काहीही नुकसान होणार नाही . परंतु सामनेवाला क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दाखल केला असल्याने अर्जदारास नाहक त्रास झाला असल्याने सामनेवाला क्र. १ व २ यांचेवर खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– <u>आदेश</u> –**

१. सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार यांना रक्कम रुपये २००/–(रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देणेचे अटीवर सामनेवाला यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र. १ व २ यांनी खर्चाची रक्कम अर्जदार यांना दिल्यानंतर त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.06.15 11:07:15 +0530

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक – १३/०६/२०२३